❁ प्रकरण २ रे ❁

# कवी ग्रेस यांचा स्थूल जीवनपरिचय आणि कवी म्हणून झालेली त्यांची जडणघडण

## ❋ प्रकरण २ रे ❋

# कवी ग्रेस यांचा स्थूल जीवनपरिचय आणि कवी म्हणून झालेली त्यांची जडणघडण

कवी ग्रेस ऊर्फ माणिक गोडघाटे यांचा स्थूल जीवनपरिचय आणि 'कवी' म्हणून त्यांची झालेली जडण-घडण.

प्रबंधिकेच्या या दुसऱ्या प्रकरणात आपण कवी ग्रेस यांचा स्थूल जीवनपरिचय करून घेणार आहोत. ग्रेस हे आत्ममग्न भावकवी असल्याने त्यांच्या कवितेचे स्वरूप शोधताना चरित्रात्मक समीक्षेचा अवलंब करावयाचा आहे. त्यासाठी आपणास कवी ग्रेस यांची झालेली जडण-घडण आणि त्यांची जीवनदृष्टी समजून घ्यावयाची आहे.

कोणताही कलावंत व्यावहारिक पातळीवर प्रथम माणूस असतो. सर्वसामान्य माणसाप्रमाणेच सर्व सुखदुःखे देहधर्म त्याला भोगावे लागतातच. नित्य-नैमित्तिक जीवनात येणाऱ्या अनुभवातून त्याच्या विचारधारणा ठरत जातात. जीवनानुभवाच्या व्यापकतेतून आणि विविधतेतून व्यक्तीची जीवननिष्ठा, जीवनदृष्टी विकसित होत जाते. त्यातूनच त्याचे व्यक्तित्व घडत जाते, असे असले तरीही सर्वसामान्य माणूस आणि कलावंत यांच्यातील फरक,जाणिवा-नेणिवांच्या, संवेदनशीलतेच्या उच्चस्तराच्या पातळीवर सिध्द होत असतो. वात्सल्य, प्रेम, शृंगार, कामवासना, अस्तित्वबुध्दी, श्रध्दा यासारख्या अनेक भावना या वैश्विक (universal) असल्या तरीही सामान्य माणूस आणि कवी अथवा कलावंत यांच्या भावविश्वात त्यांची तीव्रता, परिणामकारकता आणि सूक्ष्मता यामुळे अंतर पडते. म्हणूनच एखादया छोटया-मोठया घटनेचा जितका खोलवर परिणाम कलावंताच्या मनावर होतो आणि त्यातून जी भावांदोलने निर्माण होतात. तसाच परिणाम सर्वसामान्य व्यक्तीच्या मनावर होईलच असे नाही. कलावंताच्या या वेगळया भाववृत्तीमुळेच तो इतरांपेक्षा वेगळा ठरतो.

कलावंताच्या व्यक्तित्वाचा त्याच्या कलाकृतीशी अतूट, घनिष्ट संबंध असतो. त्याच्या विचारांची, जाणिवांची, भाव-भावनांची प्रतिबिंबे त्याच्या कलाकृतीतून उमटतात. त्याचप्रमाणे त्याची जीवनदृष्टी आणि काव्यविषयक दृष्टीही व्यक्त होते. ग्रेस यांच्या कवितांचा अभ्यास करताना त्यांच्या व्यक्तिगत जीवनाचा परिचय करून घेणे

अत्यावश्यक आहे. 'चरित्रात्मक समीक्षा' ही कितीही वादग्रस्त असली तरीही, कवी जेव्हा समाजाचा होतो तेव्हा त्याचे जीवन व्यक्तिगत न रहाता त्याला सामाजिकता येते, हा एक भाग झाला आणि दुसरे म्हणजे ग्रेस यांच्या आत्ममग्न कवितांचा अभ्यास करताना त्यांचे व्यक्तिगत जीवन अपरिचित राहिले तर त्यांची कविताही अपरिचित आणि अबोध रहाते. म्हणूनच ग्रेस यांच्या जीवनाचा परिचय करून घेऊन त्यांच्या कविमनाची झालेली जडणघडण समजून घ्यावी लागते. त्यांची जीवनदृष्टी आणि काव्यविषयक दृष्टी याच मार्गाने समजण्यास मदत होते. ग्रेस हे कमालीचे आत्ममग्न कवी असल्यामुळे चरित्रात्मक समीक्षेतूनच त्यांच्या कवितांचा शोध घ्यावा लागतो.

कवी ग्रेस यांचे पूर्ण नाव माणिक सीताराम गोडघाटे असे असून 'ग्रेस' हे नाव त्यांनी टोपणनाव म्हणून स्वीकारले आहे. तरीही या स्वीकारलेल्या नावामागेही ग्रेस यांच्या मनाचे प्रतिबिंब आहे असे वाटते. 'ग्रेस' या शब्दाचा अर्थ ऑक्सफर्ड ॲडव्हान्सड् डिक्शनरीमध्ये 'God's mercy and favour towards mankind' असा दिलेला आहे. ग्रेस या नावातही दैवी, अलौकिक आणि ईश्वरी पण गूढ असा अर्थ आहे.

'ग्रेस' या स्वतःच्या नावाबद्दल कवी ग्रेस म्हणतात, ''इन्ग्रिडची आणि माझी पहिली भेट, 'इन ऑफ द हॅपिनेस' या अविस्मरणीय बोलपटात झाली. त्या बोलपटात ती एका भाववृत्तीत (अध्यात्मिक नव्हे) सापडली असता तिच्यासंबंधी साधे वाक्य येते - 'शी इज इन ग्रेस. she is in grace' मला भास झाला, तिने हलकीशी शीळ घातली आहे. त्या लहरीने माझ्या आत्म्यावरची धूळ उडते आहे. माझ्या प्रतिमारूपाचा पहिला साक्षात्कार मला इन्ग्रिडमध्ये झाला. मग पुढे माझ्यावतीने रामदास भटकळ आणि तारा वनारसे तिला लंडनमध्ये भेटले. 'अ मंथ इन द कंट्री' या नाटकात ती काम करीत होती. इन्ग्रिडने रामदासला माझ्यासाठी आपला फोटो स्वाक्षरी करून दिला. इन्ग्रिडचे ऋण कसे आठवत रहावे? मग मी 'ग्रेस' हे नाव धारण केले आणि 'संध्याकाळच्या कविता' तिच्या दिशेने सोडून दिल्या.''[१]

स्वतःच्या नावाबद्दल आणखी एक तपशील देताना ग्रेस म्हणतात, ''मी रेग्यांसाठीच 'ग्रेस' हे वाङ्मयनाम जे की माझ्या निर्मितीच्या अंतर्विश्वाचे खरे खुरे प्रतिनिधित्व करणारे नाव आहे असे मला वाटते, मी घेतले. 'छंद' च्या एकाच अंकात माझ्या कवितांचा गुच्छ रेग्यांनी छापला आणि माझ्या वाङ्मयीन आयुष्यात या नावाची मुद्रा कायम

झाली.''[२]

स्वतःच्या 'ग्रेस' या नावाबद्दल ते खूपच हळवे आणि जागरूक असावेत कारण -

माझी आई रामदासला दिसली
तिचे नाव सुमित्रा
मला सौमित्र म्हणता मग?
... ग्रेस माझे पाळण्यातले नाव नाही.

असे ते 'साजणवेळा' या ध्वनीफीतीतील स्वगतामध्ये म्हणतात. तरीही ते 'ग्रेस' हे नाव स्वीकारतात त्याबद्दल काही अंदाज बांधता येतील. 'ग्रेस' हा शब्द 'ईश्वरीकृपा' या संकल्पनेशी तसेच धर्मभावनेच्या अनुभूतीशीही कमालीचा निगडीत आहे. त्यांच्या कवितेत आढळणारी आस्तिक्यबुध्दी, ख्रिस्तकरूणा यांचा संबंध थेट 'ग्रेस' या शब्दाशी जुळतो. तसेच 'ग्रेस' या शब्दात ईश्वरी, अलौकिक भाव असल्याने कवीला ते आवडणे सहाजिकच आहे. ''आपल्या जीवाहून (सेल्फहून) विराट आणि सर्वव्यापी असलेल्या आत्म्यामधून ('सोल'मधून) एक समृध्द चैतन्यज्योत आपल्यात वाहत येत आहे, याची जाण म्हणजे ग्रेसची जाण.'' असे या अनुभूतीचे स्वरूप असल्याचे सांगतात.[३]

ग्रेस यांची कविता मनाच्या गूढ व अबोध अवस्थेतून येते आणि ईश्वराच्या अनंतत्त्वाबद्दल कविला वाटणारी श्रध्दा अध्यात्मिक स्वरूपातून शब्दसाकार होते, म्हणूनच ग्रेस यांचे स्वतःच्या नावाबद्दलचे स्पष्टीकरण मान्य करता येते.

ग्रेस एम.ए.(मराठी) ची परीक्षा प्रथम वर्गात, प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्याविषयाचे ना.के.बेहरे सुवर्णपदक त्यांना मिळाले. १९६६ ते १९६८ धनवटे नॅशनल कॉलेज येथे, आणि त्यानंतर नागपूर महाविद्यालय नागपूर येथे मराठीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' या मुखपत्राचे ते १९७१ ते १९७४ या काळात संपादक होते. त्यानंतर मुंबईच्या रायटर्स सेंटर या संस्थेच्या 'संदर्भ' या द्वैमासिकाचेही त्यांनी संपादक केले. ग्रेस यांनी 'युगवाणी' चे संपादन केले ते, त्यांचे मौलिक वाङ्मयीन कर्तृत्व आणि प्रतिभेचा वेगळा पैलू म्हणून गौरविले जाते. 'संदर्भ' चे संपादन त्यांनी यशस्वीपणे केले म्हणूनच हृदयनाथ मंगेशकर, किशोरी अमोणकर, प्रभा अत्रे यांनीही 'संदर्भ' साठी लेखन केले असे ग्रेस यांचे म्हणणे आहे.[४]

ग्रेस यांच्या 'चर्चबेल' या ललित लेखसंग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच 'चंद्रमाधवीचे प्रदेश' या काव्यसंग्रहासही महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'राजपुत्र आणि डार्लिंग' या काव्यसंग्रहास 'उत्कृष्ट निर्मितीचा' पुरस्कार तर 'संध्याकाळच्या कविता' या काव्यसंग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. नुकताच त्यांना सोलापूरचा 'भैरूरतन दमाणी' पुरस्कार 'संध्यामग्न पुरूषाची लक्षणे' या ललित लेखसंग्रहासाठी मिळाला आहे.

ग्रेस यांचे बालपण तसे दुःखातच गेले. गरिबीत राहूनही ग्रेस यांनी स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. लहानपणीच त्यांच्या वाटयाला आलेले पोरकेपण आणि एकाकीपण त्यांनी केवळ सोसलेच नाही तर त्या एकाकीपणालाच त्यांनी आपले सोबती बनविले आहे. व्यसनी वडील, क्षयी मरणोन्मुख आई आणि लहान लहान भावंडे या सर्व परिस्थितीतून दुःख व वेदना सोसणारे ग्रेस कवितेतून सतत भेटत रहातात. स्वतःच्या या स्थितीबद्दल ग्रेस म्हणतात, ''सुमित्रा सोडून चार सावत्र आया, प्रचंड बायामाणसांचे कुटुंब. आदीम गुहेतील इच्छा वासनांचे बंध-अनुबंध लहानपणीच दिसले. सुमित्रा गेल्यावर मी पूर्ण एकटा पडलो. आणि तिथंच बालपण शिळेसारखे गोठले. तेव्हाचे भय... सुमित्रेच्या जीवाचे मैत्र काय वर्णू? Irrespective of my growing age, I was competed to retain a stupid, sensitive child inside my ribs या सुमित्रेच्या दिग्दर्शनाने माझे जीवनधर्म, सृजनाच्या दर्पणापुढेच अभिमुख केलेत.''[५]

ग्रेस यांना जीवनात सर्वच स्तरावर म्हणजे कौटुंबिक आर्थिक, भावनिक, सामाजिक अशा अनेक स्तरांवर संघर्ष करावा लागला. त्यांनी तो समर्थपणे व मानीपणाने केलाही. गरीबीपेक्षाही आईचा मृत्यू, त्यातून आलेले मातृवियोगाचे दुःख त्यांना प्रकर्षाने विव्हल करत आहे. मातृप्रेमासाठी आसावलेले त्यांचे मन त्यांच्या कवितेतून ठायी ठायी भेटते.

डॉ.लीला गुणवर्धिनी यांच्याशी ग्रेस यांचा विवाह केवळ दोन मित्रांच्या साक्षीने झाला. पण वैवाहिक जीवनातील आनंदही त्यांना दीर्घकाळ लाभला नाही. लीलाताई सतत आजारी असत. त्यातच त्या ग्रेसना एकटेपणाचे आणखी दुःख देऊ न स्वर्गवासी झाल्या. मिथिला, माधवी या त्यांच्या दोन मुली आणि राघव हा त्यांचा मुलगा. त्यांच्या दोन्ही मुली डॉक्टर झाल्या. राघवने व्यापारशास्त्राचे पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे.

पत्नीच्या मृत्युनंतर ग्रेस यांनी तिन्ही मुलांना 'आई'च्या मायेने वाढविले. त्यांच्या मुलींचा आणि मुलाचा उल्लेख काही कवितेतून आला आहे. कवी ग्रेस हे कुटुंबवत्सल आहेत, प्रेमळ, हळवे आहेत हेच यातून जाणवत रहाते.

ग्रेस यांचे पहिले प्रेम कविता आहे. संगीत हा त्यांचा श्वास आहे. व्हायोलियन वाजवण्याचा छंद त्यांनी जोपासला आहेच. याशिवाय 'पोहणे, चित्रपट पहाणे' आणि 'झपाटलेपणाने वाचन करणे' हे त्यांचे आवडते छंद आहेत. एक रसिक हृदय असणारा हा हळवा कवी स्वच्छंदी आणि जीवनावर प्रेम करणारा असावा असे निश्चितपणे वाटते. कविता हीच त्यांनी आपल्या जीवनाची वाट मानली आहे.

श्री चक्रधर, म्हाइंभट, ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, कबीर, जे.कृष्णमूर्ती,टागोर, टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की, श्री.म.माटे, रिल्के, जी.ए.कुलकर्णी, एमिली इ. लेखक, कवी त्यांना विशेष आवडतात. धों.वि.देशपांडे आणि जी.ए.कुलकर्णी त्यांच्या जीवाभावाचे मित्र आहेत. जी.ए.कुलकर्णींशी त्यांचा पत्रव्यवहार होत असे. जी.ए. आणि ग्रेस यांची भेट झाली नाही तरीही जी.एं.ची आणि ग्रेस यांची पत्रमैत्री ही अपूर्व वाङ्मयीन आणि प्रतिभासंपन्न विचारांची देवाणघेवाण असावी. कारण त्याबद्दल ग्रेस स्वतःच खूप अभिमानाने आणि आनंदाने बोलतात.

ग्रेस यांचा स्वभाव एकांतप्रिय, मनस्वी आणि कमालीचा हळवा असावा असे त्यांच्या कवितातून आणि मुलाखतीतून कळते. त्यांनी सोसलेले दुःख त्यांच्या चेहऱ्यावर दिसते आणि त्यांच्या आवाजातही जाणवते. अर्थात आईचा विरह, पितृप्रेमाचा अभाव, गरिबी यातून निर्माण झालेली दुःखे ते स्पष्टपणे बोलून दाखवतात. पण याहीपेक्षा वेगळे, विलक्षण दुःख त्यांच्या मनामेंदूत भरून राहिले आहे. पण ते कोणते दुःख आहे? कशाचे? कशामुळे आहे? याचे नेमके कारण स्पष्ट शब्दात न सांगता ते कवितांमधून सूचित करतात. ग्रेस यांच्या स्वभावाचे खास वैशिष्टय आहे की या दुःखाला ते क्षणभरही दूर करत नाहीत. उलट त्या दुःखावर ते झपाटून प्रेम करतात. त्या दुःखालाही त्यांनी एकप्रकारची त्यांच्यापुरतीच शिस्तबध्दता आणली आहे.

कवी म्हणून ग्रेस यांच्या व्यक्तित्वाची जडणघडण कशी झाली याबद्दल स्वतः ग्रेस म्हणतात, "माझ्या जडणघडणीवर फक्त माझ्या आईचा व ईश्वराचाच परिणाम झाला आहे. व ही परिणाम-प्रक्रीया मला शेवटची नीज येईपर्यंत अखंड सुरू रहाणार."[६]

तसे पाहिले तर प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीवर त्याच्या आईचा परिणाम होतच असतो. ईश्वराचा परिणाम जडणघडणीवर होणे याबाबत बोलायचे झाले तर माणसाला वैचारिक परिपक्वता आल्यानंतरच तो ईश्वरी परिणामांविषयी बोलू शकेल. त्यामुळे ग्रेस यांचे हे विधान तसे सार्वत्रिक किंवा वैश्विक (universal)ही होऊ शकते. मानवी मनाची जडण-घडण आणि विचारकोश तयार होताना केवळ या दोनच गोष्टींचा विचार करून चालणार नाही, ज्या परिस्थितीत आणि आजूबाजूच्या वातावरणात माणूस वाढतो, वावरतो, जगतो, त्या वातावरणाचा, क्रिया, प्रतिक्रियांचा आणि भेटणाऱ्या व्यक्तींचाही परिणाम मानवी मनावर होतच असतो. येणाऱ्या अनुभूतीतून निर्माण होणाऱ्या भावनिक आंदोलनातूनच चिंतनातूनच त्याचा भावकोश, विचारकोश, प्रगल्भ, समृध्द होत जातो. त्यातूनच त्याचे व्यक्तिमत्व घडत जाते, याबद्दल कोणाचेच दुमत असणार नाही. कवी आणि लेखक यांचेही वाचन त्यांचे चिंतन-मनन सुध्दा, त्यांचे विचार आणि व्यक्तिमत्व घडवण्यास कारणीभूत ठरतेच. त्यामुळे व्यक्तित्वाची जडणघडण होताना वरील गोष्टीही अपरिहार्यपणे विचारात घ्याव्याच लागतात. इतकेच काय पण चर्चबेलच्या आवरणावर 'चर्चबेल' बद्दल लिहताना जो मजकूर छापला आहे, त्यामध्येही - 'तुकयाच्या अभंगवाणीवर पोसलेले, रोशनच्या गाण्यांनी समृध्द झालेले, हॉस्पिटलमधल्या प्रदीर्घ वास्तव्यामुळे मृत्यूविषयी अधिक प्रगल्भ विचार करणारे, माणसामाणसातील स्वभाववैचित्र्यावर व व्यक्तिवैशिष्ट्यांवर लोभावून जाणारे, झाडे आणि घोडे यांच्यामुळे वेडावलेले ग्रेसचे कविमन....'' असा उल्लेख आहे म्हणजेच ग्रेस यांच्यावर केवळ आई आणि ईश्वराचाच परिणाम झाला आहे असे ग्रेस यांचे म्हणणे थोडे विसंगतच होईल. दोन्हीही विधानात विसंगती जाणवते. 'चर्चबेल'च्या मलपृष्ठावरील मजकूर ग्रेस यांना मान्य असल्यास त्या पार्श्वभूमीवर ही विसंगती अधिकच जाणवत रहाते.

ग्रेस यांच्या कवितांतून, ललितनिबंधातून अनेक वाङ्मयीन व्यक्तिमत्वे, चित्रपटातील व्यक्तिमत्वे, पाश्चात्य वाङ्मयीतील व्यक्ती, अभिनेते, अभिनेत्री यांचा उल्लेख येतो. याचाच अर्थ त्यांच्यावर त्या त्या व्यक्तिंचा, व्यक्तिमत्वांचा, त्यांच्या लेखनाचा, अभिनयांचा, मतांचा परिणाम ग्रेस यांच्यावर झालेला आहेच. ज्ञानेश्वर, तुकाराम, म्हाइंभट, चक्रधर, जनाबाई, रामदास, कबीर यांचे उल्लेख आणि संदर्भ त्यांच्या लेखनातून, कवितातून येतातच. याशिवाय रामायण महाभारताचाही त्यांच्यावर खूपच प्रभाव असावा, कारण त्यातील व्यक्तीचे संदर्भही त्यांच्या कवितेतून बहुलतेने आढळतात. त्यांच्या

भावविश्वात ज्या ज्या व्यक्तींना अढळ स्थान आहे, अशाही व्यक्तींचे उल्लेख, संदर्भ त्यांच्या कवितेतून आढळतात.

आई आणि आईचा वियोग, वात्सल्य हा ग्रेस यांच्या कवितांचा आत्मा बनलेला आहे. 'आई' हे त्यांच्या दृष्टीने एक 'सुप्रीम सिम्बॉल' आहे. म्हणूनच स्वतःच्या आईविषयी ते म्हणतात, ''माझी 'आई' तशी नाही. शी स्टँडस् इन् माय पोएट्री अॅज ए सुप्रीम सिम्बॉल ऑफ एंटायर वुमनहुड. जशी ती स्त्री या संकल्पनेची प्रतिनिधी आहे. त्याचप्रमाणे ती 'स्त्री' तून निर्माण होणाऱ्या सर्व नात्यांचीही प्रतिनिधी आहे.'' म्हणूनच ग्रेस यांच्या सर्वच काव्यविश्वावर आणि भावविश्वावर त्यांची आई संपूर्णपणे व्यापलेली दिसते. आईचा मृत्यू ही घटना ग्रेस यांना उध्वस्त करून गेली आहे. त्यांना 'स्मृती उदासी'ने किंवा Nostalgia या विकाराने ग्रासले आहे. आईचा वियोग ते क्षणभरही सहन करू शकत नाहीत.

ग्रेस यांची जीवनदृष्टी एका विशिष्ट शब्दातून वाक्यातून सांगणे अवघडच वाटते. कारण त्यांच्या कवितेतून सतत मृत्यूचे चिंतन, निर्मितीनाशाचे भय व्यक्त होते. त्यांचे प्रत्यक्ष व्यावहारिक जीवन दुःखाने, संघर्षाने भरले असले तरीही त्यांनी त्या दुःखाला आणि संघर्षाला समर्थपणे तोंड दिले आहे. एके ठिकाणी ग्रेस म्हणतात ''मी फार भोगले आहे, सोसले आहे. राखरांगोळी होईपर्यंत जीव जाईपर्यंत''[७] इतके दुःख भोगणारा कवी जीवनावर कसे आणि किती प्रेम करतो हे समजणे, सांगणे कठीणच. पण कवी ग्रेस यांचे दुःख सर्वसामान्यांइतके नाही. हे दुःख 'ईश्वरी' आहे. ग्रेस सर्वत्र या दुःखाचे रूप पाहतात. या सर्वांच्या मुळाशी मातृवियोगाचे दुःख पराकाष्टेचे आहे.

वात्सल्य, करूणा आणि वासना या जाणिवा त्यांचे जीवन व्यापूनही दशांगुळे वर राहिल्या असाव्यात. कारण त्यांच्या सर्वच कवितांतून या जाणिवा आविष्कृत झाल्या आहेत. पण यातही प्रचंड एकाकीपणा त्यांना अखंडपणे जाणवत रहातोच. या एकटेपणाबद्दल ग्रेस म्हणतात, ''एकटेपणा हा माझ्या व्यक्तित्वाचा प्रधान धर्म आहे ज्या अनुभवातून मी हा एकटेपणा स्वीकारतो त्याच अनुभवातून अनेक प्रतिमांची निर्मिती होते.''[८] म्हणूनच हा एकाकीपणा ग्रेस यांना प्रिय आहे. अलिप्तपणाने जगणे, गर्दीपासून दूर रहाणे त्यांना आवडते. कमालीचे आत्ममग्न असणे, हा एकाकीपणा ग्रेस यांना प्रिय आहे. अलिप्तपणाने जगणे, गर्दीपासून दूर रहाणे त्यांना आवडते. कमालीचे आत्ममग्न असणे, हा त्यांचा स्थायीभाव आणि अज्ञेयाच्या पातळीत रममाण होणे हाच ध्यास असल्यामुळे त्यांच्या

जीवनदृष्टीचा शोध घेणे कठीण जाते.

ग्रेस यांच्या जीवनात आणि भावविश्वात 'स्त्री' ला अनन्यसाधारण स्थान आहे. याबद्दल स्वतः ग्रेस म्हणतात, "स्त्रियांची मैत्री हे माझ्या भावविश्वाचे अतिशय उंच ठिकाण आहे." ग्रेस यांच्या मनात स्त्रीची विविध रूपे आणि स्त्री-देहाचे अखंड चिंतन चालू असते. म्हणूनच 'स्त्री' हा ग्रेस यांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. जीवनाचा आणि जीवनरहस्याचा शोध घेतानाच ग्रेस यांच्या मनातील मृत्यूची जाणीव, मृत्यूचे चिंतन कधीही तृप्त होत नाही. म्हणूनच ते स्वतःला दुःखाचा महाकवी म्हणवून घेतात.

'मी महाकवी दुःखाचा
प्राचीन नदीपरि खोल
दगडाचे माझ्या हाती
वेगाने होते फूल.'

हॉस्पिटलमधल्या प्रदीर्घ वास्तव्यामुळे ग्रेस मृत्युविषयक चिंतन करतात त्यांच्या संपूर्ण कवितातून मृत्यूचे चिंतन व मृत्युबद्दलचे प्रगल्भ विचार येतात. हॉस्पिटलमधील सहवासात त्यांनी पाहिलेले मृत्यू, आईचा मृत्यू, प्रिय पत्नीचा मृत्यू अशा अनेक घटनांमुळे त्यांची मृत्युविषयक जाणीव हळवी, दुखरी आहे आणि सतत प्रवाही राहिली आहे. तीच त्यांच्या कवितांतून, ललित निबंधातून वहाताना जाणवत रहाते.

ग्रेस यांनी खूप दुःख भोगले आहे. त्यामुळेच त्यांच्या कवितातून न संपणारे दुःख येत रहाते. आई गेल्यानंतर लहान बहीणींचा आईच्या मायेने सांभाळ करणारे ग्रेस मानसिक ओढाताणीत आणि घरातील सर्वांची देखभाल करताना होणाऱ्या ससेहोलपटीत भरडत राहिले. ही ओढाताण व्यक्त करताना ते एकेठिकाणी म्हणतात, "हे असं होतं, म्हातारीनं जाताना याचा तरी विचार करायला हवा होता ना ! आता तूच सांग"[१]

साठोत्तर मराठी कवितेचा विचार करताना कवी ग्रेस यांचा मराठी कवितेतील वेगळा ठसा चटकन लक्षात येतो. मराठीतील संत-पंत-तंत साहित्य, सूफी तत्त्वज्ञान आणि काही महत्वाचे पाश्चात्य कवी यांचे वाचन ग्रेस यांनी अभ्यासपूर्वक, चिंतन-मननपूर्वक केल्याचे जाणवते. याशिवाय त्यांच्या कवितेतून, ललित निबंधातून उर्दू शेर-शायरी, हिंदी चित्रपटगीते, हिंदी-उर्दू गझला यांचाही उल्लेख खूपच आधिक्याने येतो. या सर्व साहित्यप्रकारांबरोबर टागोर, एमिली डिकिन्सन, एमिली ब्रांते, ज्ञानेश्वर, तुकाराम

इ.कवी, संत,लेखक यांच्याही वाङ्मयाने ग्रेस यांची विचारसरणी आणि प्रतिभा समृध्द व सुसंस्कृत झाली, असे लक्षात येते.

'सांध्यपर्व' या व्हिडिओ कॅसेटमध्ये ते स्वतःच्या काव्यनिर्मितीवर 'कबीर' या संतकवीचा,, इस्लामच्या प्रार्थनांचा प्रभाव असल्याचे सांगतात. ग्रेस यांच्याबद्दल इतरांनी केलेली वक्तव्ये आणि ग्रेस यांनी स्वतःबद्दल केलेली विधाने, त्यांच्या कवितांचे विषय-आशय पहाता ग्रेस यांची जीवनदृष्टी नेमक्या शब्दात सांगणे अवघड आहे. पण दुःखाला शिस्त मागणे, कोणत्याही प्रश्नाला त्यांच्याकडे उत्तर नसणे, सतत स्वप्नतंद्रीत रहाणे, संगीतावर, निसर्गावर अफाट प्रेम करणे, सतत मृत्यूचे चिंतन, आईच्या स्मृतींमध्ये चूर होऊन जाणे, कारूण्य, प्रेम,शृंगार, यांची मनात सतत आंदोलने होत रहाणे, ही त्यांची स्वभाववैशिष्टयेच त्यांची जीवनदृष्टी ठरवितात. ईश्वराकडे प्रार्थना करताना ग्रेस जे शब्द उच्चारतात त्यावरून त्यांची जीवनाकडूनची अपेक्षा समजण्यास मदत होते. ते म्हणतात, "ईश्वरा, माझ्या सभ्यपणावर व कवितेवर कुणालाही मात करू देऊ नकोस."

"कलावंताचे नेतृत्व कुठलाही पंथ, प्रणाली करू शकत नाही तर त्याचे नेतृत्व त्याची कविता करते. म्हणून तो स्वायत्त आणि निरंकुश असतो." (सांध्यपर्व - चित्रफीत ग्रेस) यावरून मला असे वाटते की, कविता हेच ग्रेस यांचे सारसर्वस्व आहे. कविताच त्यांचे जीवन आणि जीवनदृष्टीही आहे. ज्या बोलपटावरून त्यांनी स्वतःचे 'ग्रेस' हे नाव धारण केले आहे, त्यावरूनच चित्रपट वाङ्मय आणि स्वप्ननगरीत पूर्णपणे चूर होऊन आत्ममग्न झालेले कवी ग्रेस वास्तवाच्या विश्वात भेटणे थोडे कठीणच आहे. त्यांची जीवनदृष्टी समजून घेण्यासाठी त्यांच्या प्रतिभासृष्टीतील स्वप्ननगरीतच जावे लागणार आहे, कारण स्वतः ग्रेसच एके ठिकाणी म्हणतात - "creativity is my life and its conviction is the character of my creativity"[१०]

**सारांश -** ग्रेस यांनी बालपणापासूनच अत्यंत दुःख भोगले आहे. पण तरीही ते त्या दुःखाबद्दल आक्रस्ताळेपणा करीत नाहीत. ते दुःखाचा स्वीकार करतात. त्यांचा स्वभाव एकांतप्रिय आहे. त्यांचा वाचनाचा व्यासंग, मृत्यूजाणीव, अध्यात्मचिंतन, निसर्गप्रेम आणि आईविषयीचा वात्सल्यभाव कमालीचा विलक्षण आहे. ग्रेस यांचा स्त्री-पुरूषाच्या सनातन नात्यामधील मूलगामी शोध प्रदीर्घ आणि अखंड चालू आहे.

कविता हेच ग्रेस यांचे जीवन आहे. त्यांची स्वतःची अशी एक जीवनदृष्टी

आहे पण ती कधीही स्थिर नाही. कारण भासचक्राचे तोल सावरत कवी ग्रेस वास्तवजीवन जगत आहेत. सत्य आणि स्वप्न, वास्तव आणि भास-अभास यांच्या सीमारेषेवर, त्यांच्या स्वतःच्या प्रतिभापातळीवर ते वास करतात. एकांताची कलावंताला आवश्यकता असते असे त्यांचे ठाम मत आहे. संध्याकाळचा समय हा त्यांच्या निर्मितीविश्वाचा घटक आहे. ग्रेस हे शब्दांवर प्रेम करणारे आत्ममग्न, संगीतवेडे कवी आहेत.

## संदर्भसूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग्रेस | : | ग्रेस मुलाखत ग्रंथमाला खंड १, अंश १ १९८४ डॉ.अक्षयकुमार काळे यांनी घेतलेली ग्रेस यांची दीर्घ मुलाखत पृष्ठ ८४ |
| २) | ग्रेस | : | तत्रैव पृष्ठ ८५ |
| ३) | त्र्यं.वि.सरदेशमुख | : | 'धुके आणि शिल्प' प्रकाशक म.ना.जोशी सन पब्लिकेशन्स पुणे आवृत्ती १ एप्रिल १९८५ पृष्ठ ८९ |
| ४) | ग्रेस | : | ग्रेस : मुलाखत ग्रंथमाला खंड १ अंश १, १९८४ पृष्ठ १३७. डॉ.अक्षयकुमार काळे यांनी घेतलेली ग्रेस यांची दीर्घ मुलाखत |
| ५) | ग्रेस | : | 'प्राक्तनलिपीतली नक्षत्रे' महाराष्ट्र टाईम्स वार्षिक १८९४ पृष्ठ ६७. |
| ६) | ग्रेस | : | 'ग्रेस : मुलाखत' ग्रंथमाला खंड १ अंश १, १९८४ पृष्ठ १३७. डॉ.अक्षयकुमार काळे यांनी घेतलेली ग्रेस यांची दीर्घ मुलाखत. |
| ७) | ग्रेस | : | 'ग्रेस : व्यक्तित्व आणि वाङ्मयीन कर्तृत्व' प्रा.चं.वि.जोशी यांनी घेतलेली ग्रेस यांची मुलाखत अनुबंध त्रैमासिक पृष्ठ २६. |
| ८) | ग्रेस | : | डॉ.अक्षयकुमार काळे 'प्रतिभावंतांचे पाताळघर' तरूण भारत दिवाळी १९८३ संपादक दि.बा.घुमरे, नागपूर पृष्ठ ५८ |
| ९) | मधुकर केचे | : | 'आपल्या अनुभवतंद्रीतून अस्सल प्रतिभेचे मोती वेचणारा कलंदर कवी - ग्रेस' मनोहर संपादक शं.वा.किर्लोस्कर जाने.१९६९ पृष्ठ १२. |

१०) ग्रेस : 'सांध्यपर्व' ध्वनि-चित्रफित, कवी ग्रेस यांचे मुक्तचिंतन : स्वतःच्या कवितेविषयी ८-६ शारदा सेंटरजवळ कर्वेरोड पुणे-४, १९९७

****